महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**


आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com


---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च 2020

4. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2020/प्र.क्र.04/व्यय-9 दिनांक 29 मे, 2020

---0000---

क्र दंडप्र-01/कावि/2020/ 462 दिनांक 09 सप्टेबर, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड - 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, कोरोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी,उपचार व मदत कार्य यांचेशी संबंधीत कर्तव्य बजावित असतांना शासनाच्या विविध विभागातील विविध प्रवर्गातील कर्मचारी यांचा कोरोना विषाणूशी जवळून संबंध येत आहे. अशा कर्मचा-यांची काळजी घेण्यासाठी शासन कटिबध्द असून या असुरक्षित परिस्थितीत त्यांच्या मागे ठामपणे उभे राहणेकामी वाचले क्र.04 च्या शासन निर्णयान्वये, कोव्हिड-19 संबंधीत कर्तव्य बजावताना कोव्हिडमुळे मृत्यू होणा-या कर्मचा-यांना विमा कवच/ सानुग्रह सहाय्य लागू करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, आरोग्य सेवा संबंधीत कर्मचा-यांव्यतिरिक्त जिल्हा प्रशासनातील कर्मचारी मोठया प्रमाणात कोव्हिड संबंधीत कर्तव्ये पार पाडीत आहेत. कोव्हिड -19 च्या सार्वत्रिक साथीशी लढा देण्यासाठी सक्रीय राहून कर्तव्य बजावणा-या अशा कर्मचा-यांचा दुर्देवाने मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंबियांना रक्कम रु.50.00 लक्ष रकमेचे सानुग्रह सहाय्य मिळणेबाबत शासन निर्णयात नमूद अटी व शर्तीस अधीन राहून शासन स्तरावर परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, **मी. अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयात कोव्हिड-19 संबंधीत कर्तव्य बजावताना कोव्हिडमुळे मृत्यू होणा-या जिल्हा प्रशासनातील कर्मचा-यांना विमा कवच/ सानुग्रह सहाय्य करणेबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करणेकामी **तहसीलदार महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव** यांची **सनियंत्रण अधिकारी** म्हणून नेमणूक करीत आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2020/ प्र.क्र.04/व्यय-9 दिनांक 29 मे, 2020 मधील नमूद तरतूदीनुसार प्राप्त होणा-या प्रस्तावांची छाननी करणे, त्रुटीची पुर्तता करुन घेवून शासनास परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेकामी **नायब तहसिलदार (महसूल)तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय**, जळगांव यांची नेमणूक करणेत येत आहे.

नियुक्त अधिका-यांनी त्यांचे अधिनस्त मनुष्यबळ व साधन सामुग्रीचा यथोचित वापर करुन त्यांना सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी.

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव**

**प्रत** :- सर्व संबंधितांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

**प्रत** :- उपविभागीय अधिकारी / तहसिलदार (सर्व) यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना

2/- उक्त नमूद केल्यानुसार कोव्हिड-19 संबंधीत कर्तव्य बजावताना कोव्हिडमुळे मृत्यू होणा-या जिल्हा प्रशासनातील कर्मचा-यांना विमा कवच/ सानुग्रह सहाय्यकरणेबाबतचा प्रस्ताव टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडेस सादर करणेत यावा.